21 AUG 2017

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कठोर परिश्रमासह ध्येयवेडे व्हा : डॉ. जाधव

## शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांनी कठोर परीक्षम घेतले पाहिजेत. त्याचबरोबर ध्येयवेडेही झाले पाहिजे, असे प्रतिपादन जळगांव येथील सहायक गट विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे २०१७–१८ कालावधीच्या प्रशिक्षण वर्गाच्या उदघाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के होते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. जाधव म्हणाले, स्पर्धा परीक्षांबद्दल मनामध्ये असलेली भिती प्रथमत: विद्यार्थ्यांनी काढून टाकावी. स्वत:चा आत्मविश्वास वाढवावा, कोणताही न्यूनगंड बाळगू नये. सखोल वाचन आणि त्यावरील मुद्दे यांची टिपण ठेवावे. अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नपत्रिकांचा सातत्याने अभ्यास करावा. दिवसातून कमीत कमी सहा तास अभ्यास करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे. विद्यार्थ्यांनी स्वत:मधील कमतरता ओळखून पुढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा,



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. तुषार जाधव**

कणखरवृत्ती, हाजरजावाबीवृत्ती जोपासली पाहिजे.

डॉ.जाधव यांनी पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत तंत्र याबद्दल सखोल मार्गदशन केले. ते म्हणाले, स्पर्धा परीक्षांचे अर्ज भरताना काळजीपूर्वक भरावा. त्यावर आधारित प्रश्न विचारले जावू शकतात. विद्यार्थ्यांनी सखोल वाचन, चिंतन, मनन यामध्ये सातत्य ठेवावे. विविध वर्तमानपत्रांमधील लेख वाचावेत.

प्र–कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के अध्यक्षीय भाषणात म्हणाले, आज, समाजामध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्पर्धा आहे. एमपीएससी आणि युपीएससी हया स्पर्धा परीक्षांमधील राजमार्ग आहेत. या स्पर्धेच्या जगात भक्कमपणे उभे रहावयाचे असेल तर कठोर परीश्रमाशिवाय पर्याय नाही. यावेळी डॉ.तुषार जाधव यांच्या भगिनी दिप्ती जाधव, तृप्ती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय केंद्राचे समन्वयक डॉ.जगन कराडे यांनी केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी–विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.तुषार जाधव यांच्या मातोश्री सौ.कमल जावध हया अतिरिक्त पोलीस अधिक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यांचे वडील प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या सर्व भगिनी उच्च विद्याविभूषित असून उच्चपदस्थ आहेत. डॉ.जाधव यांचे मामा आणि मावशी वरिष्ठ अधिकारी आहेत. या कुटुंबातील चारही भावंडे एकाच वेळेस सेट, नेट आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच, डॉ.तुषार जाधव हे दोन वेळेस युपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, असे यावेळी सांगण्यात आले.

2 1 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
ावाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धा परीक्षेसाठी ध्येयवेडे व्हा : डॉ. जाधव

सकाळ वृत्तसेवा



डॉ. जाधव

कोल्हापूर, ता. २० : स्पर्धा परीक्षांची तयारी करताना कठोर परिश्रमासह ध्येयवेडे व्हा, असा सल्ला सहायक गट विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी येथे दिला. शिवाजी विद्यापीठातील राज्य सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. जाधव म्हणाले, "स्पर्धा परीक्षांबद्दल मनात असलेली भीती प्रथमतः विद्यार्थ्यांनी काढून टाकावी. स्वतःचा आत्मविश्वास वाढवावा. कोणताही न्यूनगंड बाळगू नये. सखोल वाचन आणि त्यावरील मुद्दे यांची टिपण ठेवावी. अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नपत्रिकांचा सातत्याने अभ्यास करावा. दिवसातून कमीत कमी सहा तास अभ्यास करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कमतरता ओळखून पुढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, कणखर वृत्ती, हजरजबाबी वृत्ती जोपासली पाहिजे."

ते म्हणाले, "स्पर्धा परीक्षांचे अर्ज भरताना काळजीपूर्वक भरावा. त्यावर आधारित प्रश्न विचारले जाऊ शकतात. विद्यार्थ्यांनी सखोल वाचन, चिंतन, मनन यामध्ये सातत्य ठेवावे. विविध वर्तमानपत्रांमधील लेख वाचावेत. समाजकार्य करण्याची प्रचंड इच्छाशक्ती बाळगून तळागाळातील लोकांपर्यंत योजनांचा लाभ पोचविण्याची तळमळ असली पाहिजे." विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. या वेळी दीप्ती जाधव, तृप्ती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले.

## कुटुंबातील सगळेच उच्चपदस्थ

**डॉ. जाधव यांच्या आई कमल जाधव या अतिरिक्त पोलिस अधीक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यांचे वडील प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या सर्व बहिणी उच्च विद्याविभूषित असून उच्चपदस्थ आहेत. डॉ. जाधव यांचे मामा आणि मावशी वरिष्ठ अधिकारी आहेत. या कुटुंबातील चारही भावंडे एकाच वेळेस सेट, नेट आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच, डॉ. जाधव हे दोन वेळेस यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.**

2 1 AUG 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्येयवेड्या परिश्रमाने यशाला गवसणी शक्य

## डॉ. तुषार जाधव; विद्यापीठात सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रशिक्षणवर्गाचे उद्घाटन

- एमपीएससीच्या दोन वर्षांचा प्रशिक्षण कालावधी आता यूपीएससीच्या धर्तीवर सुरू करणारे एकमेव महाराष्ट्र राज्य
- प्रतिदिन सहा तास अभ्यास करावा
- विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास वाढवावा आणि मनातील न्यूनगंड काढून टाकावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी कठोर परीश्रम घ्यावेत. कारण, कठोर परिश्रमाला पर्याय नाही. त्याचबरोबर, ध्येयवेडे झाले पाहिजे. यामुळे यशाचे दार उघडत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या जळगाव येथील सहायक गटविकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे २०१७-१८ कालावधीच्या प्रशिक्षणवर्गाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. जाधव बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जाधव म्हणाले, स्पर्धा परीक्षांबद्दल मनामध्ये असलेली भीती प्रथमतः विद्यार्थ्यांनी काढून टाकावी. स्वतःचा आत्मविश्वास वाढवावा, कोणताही न्यूनगंड बाळगू नये. सखोल वाचन आणि त्यावरील मुद्दे यांची टिपणे ठेवावीत. अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नपत्रिकांचा सातत्याने अभ्यास करावा. दिवसातून कमीत कमी सहा तास अभ्यास करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कमतरता ओळखून पुढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणा, कणखरवृत्ती, हजरजबाबीवृत्ती जोपासली पाहिजे. स्पर्धा परीक्षांचे अर्ज भरताना काळजीपूर्वक भरावा. त्यावर आधारित प्रश्न विचारले जाऊ शकतात. विद्यार्थ्यांनी सखोल वाचन, चिंतन, मनन यामध्ये सातत्य ठेवावे. विविध वर्तमानपत्रांमधील लेख वाचावेत. समाजकार्य करण्याची प्रचंड इच्छाशक्ती बाळगून तळागाळातील लोकांपर्यंत योजनांचा लाभ पोहचविण्याची तळमळ असली पाहिजे. एमपीएससीच्या दोन वर्षांचा प्रशिक्षण कालावधी आता यूपीएससीच्या धर्तीवर सुरू करणारे महाराष्ट्र राज्य हे एकमेव आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या गोष्टींचा लाभ होणार आहे.

डॉ. जाधव यांनी पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत तंत्र याबद्दल सखोल मार्गदशन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे दिली.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सध्याचे युग टोकाच्या स्पर्धेचे आहे. एमपीएससी आणि यूपीएससी परीक्षा या स्पर्धा परीक्षांमधील राजमार्ग आहेत. या स्पर्धेच्या जगात भक्कमपणे उभे राहावयाचे असेल तर कठोर परीश्रमाशिवाय पर्याय नाही.

यावेळी डॉ. जाधव यांच्या भगिनी दीप्ती जाधव, तृप्ती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.